क्रमांक : का.स./बैठक/१९६

मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण,
वांद्रे-कुर्ला समूह, वांद्रे (पूर्व),
मुंबई - ४०० ०५१.

दिनांक : २२ जानेवारी, २००२.

मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या कार्यकारी समितीच्या दिनांक १६ जानेवारी, २००२ (बुधवार) रोजी झालेल्या १९६ व्या बैठकीच्या कार्यवृत्ताची प्रत सोबत पाठवित आहे.

(सुरेश परदेशी)
सचिव,
कार्यकारी समिती

प्रति :

शासनाचे मुख्य सचिव - अध्यक्ष
सामान्य प्रशासन विभाग,मंत्रालय,
मुंबई - ४०० ०३२.

श्री.द.म.सुकथनकर - सदस्य
"प्रिया", वरळी सी फेस, वरळी,
मुंबई - ४०० ०१८.

श्री.र.य.तांबे - सदस्य
ए-६००, शिवम अपार्टमेंट्स,
सुरेंद्रनगर, आरपीटीएस रोड,
नागपूर - ४४० ०१५.

श्री.दिपक पारेख - सदस्य
अध्यक्ष, एचडीएफसी लिमिटेड,
रेमन हाऊस, चर्चगेट,
मुंबई - ४०० ०२०.

शासनाचे प्रधान सचिव (१) - सदस्य
नगर विकास विभाग, मंत्रालय,
मुंबई - ४०० ०३२.

महापालिका आयुक्त - सदस्य
बृहन्मुंबई महानगरपालिका,
मुंबई - ४०० ००१.

शासनाचे प्रधान सचिव - सदस्य
गृहनिर्माण व विशेष सहाय्य विभाग,
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.

व्यवस्थापकीय संचालक - सदस्य
सिडको, निर्मल, नरीमन पॉईंट,
मुंबई - ४०० ०२३.

महानगर आयुक्त - सदस्य
मुं.म.प्र.वि.प्राधिकरण.

निमंत्रित :

शासनाचे प्रधान सचिव (२)
नगर विकास विभाग,
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.

शासनाचे प्रधान सचिव (उद्योग)
उद्योग विभाग, मंत्रालय,
मुंबई - ४०० ०३२.

शासनाचे प्रधान सचिव (पर्यावरण)
पर्यावरण विभाग, मंत्रालय,
मुंबई - ४०० ०३२.

प्रत अग्रेषित :-

विधी सल्लागार, मुं.म.प्र.वि.प्राधिकरण.

मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाचे अधिकारी

*********

# मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या
## कार्यकारी समितीच्या १९६ व्या बैठकीचे कार्यवृत्त

| | | |
|---|---|---|
| दिनांक | : | १६ जानेवारी, २००२ (बुधवार) |
| वेळ | : | सकाळी १०.०० वाजता |
| सभास्थान | : | मुख्य सचिवांचे समिती कक्ष,<br>५ वा मजला, मंत्रालय,<br>मुंबई-४०० ०३२. |

उपस्थित सदस्य :

| | | |
|---|---|---|
| श्री.व्ही.रंगनाथन<br>शासनाचे मुख्य सचिव | - | अध्यक्ष |
| श्री.द.म.सुकथनकर | - | सदस्य |
| श्री.र.य.तांबे | - | सदस्य |
| श्री.अवधेश प्रसाद सिन्हा<br>शासनाचे प्रधान सचिव (१),<br>नगर विकास विभाग | - | सदस्य |
| श्री.विनय मोहन लाल<br>शासनाचे प्रधान सचिव,<br>गृहनिर्माण व विशेष सहाय्य विभाग | - | सदस्य |
| श्री.अनिल कुमार लखिना<br>व्यवस्थापकीय संचालक, सिडको, | - | सदस्य |
| श्री.अजित वर्टी<br>महानगर आयुक्त | - | सदस्य |

निमंत्रित :

श्री. रामानंद तिवारी
शासनाचे प्रधान सचिव (२)
नगर विकास विभाग

श्री.रविभूषण बुध्दीराजा
शासनाचे प्रधान सचिव (पर्यावरण)
पर्यावरण विभाग

श्री.यू.पी.एस.मदान
प्रकल्प संचालक,
मुंबई नागरी परिवहन प्रकल्प

श्री.प्र.ल.बोंगिरवार
अतिरिक्त महानगर आयुक्त (अभियांत्रिकी)
मुं.म.प्र.वि.प्राधिकरण

श्री.के.एन.पटेल
विधी सल्लागार,
मुं.म.प्र.वि.प्राधिकरण

श्री.वि.कृ.फाटक
प्रधान प्रमुख,
नगर व क्षेत्र नियोजन विभाग
मुं.म.प्र.वि.प्राधिकरण

श्री.सु.प्र.पेंढारकर
प्रमुख, नियोजन विभाग
मुं.म.प्र.वि.प्राधिकरण

श्री.सुरेश परदेशी
मुख्य लेखा अधिकारी व वित्तीय सल्लागार,
सचिव, कार्यकारी समिती (अतिरिक्त कार्यभार),
मुं.म.प्र.वि.प्राधिकरण

श्री.अ.वि.घांगुर्डे
प्रमुख, परिवहन व दळणवळण विभाग,
मुं.म.प्र.वि.प्राधिकरण

बाब क्र.१ : दिनांक ८ डिसेंबर, २००१ रोजी झालेल्या कार्यकारी समितीच्या मागील (१९५ व्या) बैठकीचे कार्यवृत्त पक्के करणे.

कार्यवृत्त पक्के करण्यात आले.

**बाब क्र.२ : दिनांक ८ डिसेंबर, २००१ रोजी झालेल्या कार्यकारी समितीच्या मागील (१९५ व्या) बैठकीच्या कार्यवृत्तावरील कार्यवाही अहवाल.**

कार्यवाही अहवालावर खालील विषयांवर चर्चा करुन कार्यकारी समितीने अहवालाची नोंद घेतली :-

**बाब क्र.४ : नालासोपारा नवघर-माणिकपूर, विरार नगरपरिषदेला उसगांव पाणीपुरवठा योजनेसाठी वित्तीय सहाय्य..**

या विषयावर चर्चा करतेवेळी मा.अध्यक्षांनी अशी विचारणा केली की, वसई-विरार विभागातील नगरपरिषदांसाठी संबंधित अधिनियमाच्या कलम ८५ अन्वये सहसमितीची (COLA) स्थापना करण्याबाबतची सद्यस्थिती काय आहे. त्यावर नगर विकास विभागाचे प्रधान सचिव (२) यांनी अशी माहिती दिली की, ग्राम विकास विभाग आणि न्याय व विधी विभागाला संदर्भासाठी सदर प्रकरण दिले असता, त्यावरील मंजूरीची प्रक्रीया प्रलंबित होती. आता हे प्रकरण मार्गी लागले असून, दिनांक १७–१-२००२ रोजी योग्य ते शासकीय आदेश निर्गमित होतील. मा.अध्यक्षांनी असे निदेश दिले की, COLA च्या स्थापनेला ३ वर्षापेक्षाही अधिक काळ लागलेला आहे. या संबंधित बाबींचा संपूर्ण घटनाक्रम तक्ता त्यातील कार्यवाहीसह तयार करुन मा.अध्यक्ष यांचेकडे अवलोकनार्थ नगर विकास विभागाने सादर करावा.

**बाब क्र.६ : वांद्रे (पूर्व) येथील अनंत काणेकर मार्गाचे रुंदीकरण--निविदा स्विकारण्यास मंजूरी.**

या बाबतची माहिती देत असता अतिरिक्त महानगर आयुक्त (अभियांत्रिकी) यांनी असे नमूद केले की, अनंत काणेकर मार्ग या रस्त्याचे अंदाजपत्रक तयार केल्यानंतर त्यांस असे आढळले की, सार्वजनिक

बांधकाम विभागाच्या दरसूचीप्रमाणे काढलेली किंमत सुमारे ९.८६ टक्के बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या दरसूचीपेक्षा कमी आहे. यावर अध्यक्ष यांनी असे मत व्यक्त केले की, बृहन्मुंबई महानगरपालिकेने सार्वजनिक बांधकाम विभागाच्या दरसूचीचा वापर करणे जास्त योग्य आहे. सबब, महानगर आयुक्त यांनी या बाबत आयुक्त, बृहन्मुंबई महानगरपालिका यांना सार्वजनिक बांधकाम विभागाची दरसूची ह्यापुढे सर्वसाधारण वापरण्याबद्दल पत्ररुपाने कळवावे.

<u>बाब क्र.३</u> : <u>महाराष्ट्र शासनाच्या वित्त विभागास अतिरिक्त ठेव म्हणून रु.५०० कोटी देण्याबाबत.</u>

३.१ प्रधान सचिव (१), वित्त विभाग, महाराष्ट्र शासन हे या बैठकीस विशेष निमंत्रित म्हणून उपस्थित होते.

३.२ महानगर आयुक्त यांनी प्रथम प्रधान सचिव, महाराष्ट्र शासन, वित्त विभाग यांनी दिनांक ९ जानेवारी, २००१ च्या पत्राने राज्याची अर्थोपाय स्थिती समाधानकारक नसल्यामुळे महाराष्ट्र शासनाच्या खात्यामध्ये प्राधिकरणाने तात्काळ रु.५०० कोटीचा निधी जमा करण्याची विनंती केली आहे, सदर रकमेची परतफेड वित्त विभागाकडून १२ मासिक हप्त्यात (बाब टिप्पणीमध्ये ६ हप्ते नमूद केले आहेत) करण्यात येईल असे कळविले आहे अशी माहिती दिली.

३.३ यापूर्वी शासनाच्या वित्त विभागाने माहे नोव्हेंबर, २००१ महिन्यात प्राधिकरणाकडे रु.३०० कोटी ठेवीची मागणी केली होती. त्यापैकी रु.७५ कोटीचा डिसेंबर, २००१ मध्ये देय असलेला परतीचा पहिला हप्ता वित्त विभागाने प्राधिकरणास अदा केलेला आहे. सदर ठेवीपैकी रु.२२५ कोटी इतकी रक्कम शासनाकडून येणे अजूनही बाकी आहे. तसेच सन १९९५ मध्ये शासनाच्या वित्त विभागास रु.१६० कोटी इतकी रक्कम ठेव म्हणून १२ टक्के व्याजाच्या दराने

प्राधिकरणाकडून देण्यात आली होती. त्यावर शासनाने सन १९९६-९७ पासून व्याजही दिलेले नाही. सदरहू ठेवीवरील आजपर्यंतचे व्याज सुमारे रु.१२० कोटी इतके झाले आहे. ऑक्टोबर, १९९८ मध्ये शासनाच्या शिवशाही पुनर्वसन प्रकल्पाकरीता प्राधिकरणाने रु.१२५ कोटी ठेव १४ टक्के व्याजाच्या दराने गृहनिर्माण व विशेष सहाय्य विभागास दिली आहे. शासनाने सदर ठेवीवर सुरुवातीपासून म्हणजे ऑक्टोबर, १९९८ पासून व्याज दिलेले नाही. शासन निर्णय क्र.शाहमी १३९९/प्रक्र-२३३/गृनिधो-२, दिनांक २७ डिसेंबर, २००१ नुसार प्राधिकरणाची ठेव रक्कम ४३ मासिक हप्त्यात ९.४० टक्के व्याजाच्या दराने जानेवारी, २००२ पासून परत करण्यात येणार आहे. सदरहू ठेवीवर शासनाने जानेवारी, २००२ पासून व्याज देण्याचे ठरविले असल्यामुळे प्राधिकरणास सुमारे रु.५९.०७ कोटी इतका संभावीत तोटा सहन करावा लागणार आहे असे महानगर आयुक्त यांनी प्रतिपादन केले.

३.४ तसेच कार्यकारी समितीच्या दिनांक ३१-७-२००१ रोजी झालेल्या बैठकीत शासनाच्या वित्त विभागाने प्राधिकरणाने हयापुर्वी शासनाकडे ठेवलेल्या रु.१६० कोटी व त्यावरील प्रलंबीत व्याजाच्या परतीचे वेळापत्रक द्यावे व भारतीय घटनेच्या कलम २९३ अन्वये मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाकडून शासन कर्ज वा ठेव या स्वरुपात निधी स्विकारु शकते काय या बाबतची खात्री शासनाकडून करुन घ्यावी असे ठरले होते. वरील दोन्ही बाबींवर शासनाच्या वित्त विभागाकडून उत्तर आलेले नाही. शासनाकडे / सार्वजनिक उपक्रमांकडे ठेव म्हणून ठेवण्यात आलेला निधी व त्यावरील व्याज वेळेवर न मिळाल्यास मुंबई नागरी परिवहन प्रकल्प (मुं.ना.प.प्र.) या प्रकल्पाकरीता निधी उपलब्ध करणे प्राधिकरणास अडचणीचे होईल असे महानगर आयुक्त यांनी सांगितले.

३.५ शासनाची आर्थिक परिस्थिती हलाखीची असल्यामुळे काही कालावधीसाठी शासनाला तातडीने निधीची आवश्यकता असल्यामुळे प्राधिकरणास ठेवीबाबत विनंती करण्यात आली होती. शासनाला वेळेवर निधी उपलब्ध झाला नाही तर

त्याचे वित्तीय व्यवस्थेवर गंभीर परिणाम होतील असे प्रतिपादन प्रधान सचिव, वित्त विभाग यांनी केले.

३.६ तसेच प्राधिकरणाकडून मिळालेली रु.४०० कोटीची ठेव रक्कम शासन १२ मासिक हप्त्यात प्राधिकरणास परत करेल असे सांगितले. प्राधिकरणाकडे असलेला अतिरिक्त निधी हा वांद्रे-कुर्ला संकुलातील जमीन विक्रीतून मिळालेला आहे व सदरहू जमीन प्राधिकरणास शासनाने नाममात्र किंमतीस दिलेली आहे याचाही विचार येथे करणेही आवश्यक आहे. शासनाच्या आर्थिक कार्यपध्दतीनुसार ठेवीच्या परतफेडीचे उत्तर दिनांकित धनादेश (post dated cheque) शासनाला देणे शक्य नाही. परंतु भारतीय रिझर्व्ह बँकेच्या अधिका-यांशी चर्चा करण्यात येईल व शासनाच्या खात्यातून प्राधिकरणाचा निधी वेळेवर परस्पर वळता करुन देता येईल का, व तसे शक्य असल्यास योग्य ते आदेश/शासन निर्णय निर्गमित करण्यात येतील असे प्रधान सचिव, वित्त विभाग यांनी प्रतिपादन केले.

३.७ शासन भारतीय घटनेच्या कलम २९३ अन्वये निधी स्विकारु शकते किंवा कसे तसेच या अगोदर शासनाच्या वित्त विभागास देण्यात आलेली ठेव रक्कम रु.१६० कोटी व त्यावरील प्रलंबित व्याजाच्या परतफेडीचे वेळापत्रक हया दोन्ही बाबी वित्त विभागाकडे काही कालावधीकरीता प्रलंबीत आहेत त्यावर तातडीने कार्यवाही करण्यात येईल असेही प्रधान सचिव, वित्त विभाग यांनी सांगितले.

३.८ श्री.सुकथनकर, सदस्य यांनी शासन वेळोवेळी प्राधिकरणाकडून निधीची मागणी करीत असते, शासनाकडे प्राधिकरणाचा कमाल निधी किती असावा तसेच शासनाने जादा व्याजाच्या दराने घेतलेले कर्ज / ठेव रक्कम शासनाने प्रथम परत केल्यास शासनास व्याजापोटी देय होणा-या रक्कमेचा बोजा कमी होईल असे मत त्यांनी प्रदर्शित केले.

३.९ मुख्य सचिव व अध्यक्ष यांनी शासकीय संस्था व उपक्रम कार्यालयीन इतर सर्व बाबींवर खर्च करीत असतात. परंतु प्राधिकरणाची ठेव वेळेवर परत करीत

नाहीत, हे आर्थिक नियमाला व वित्तीय शिस्तीस अनुसरुन नाही. संबंधीत संस्थांनी प्राधिकरणाची ठेव वेळेवर अदा करणे आवश्यक आहे अन्यथा या संस्थेवर ठेवीच्या अटी व शर्तीचे पालन न केल्यामुळे कायदेशीर कारवाई करण्यात येईल. सिडको या संस्थेने प्राधिकरणाच्या ठेवीचा परतफेडीचा पहिला हप्ताही वारंवार सूचना देऊनही परत केलेला नाही. त्यावर अध्यक्षांनी नाराजी व्यक्त केली. तसेच ठेवी परत करण्याबाबतचे दिलेले वेळापत्रक सिडकोने प्राधिकरणाकडून प्रथम मान्य करुन घेणेही आवश्यक आहे असेही निदेश दिले.

३.१० शासकीय संस्थांनी त्यांची नैतिक कर्तव्ये व जबाबदारी समजून प्राधिकरणाची ठेव वेळेवर परत करणे आवश्यक आहे. अन्यथा भारतीय रिझर्व्ह बँकेच्या मार्गदर्शक तत्वाप्रमाणे ठेवीची रक्कम वेळेवर परत न आल्यामुळे या ठेवी "नॉन परफॉर्मिंग ॲसेट" (Non Performing Assets) म्हणून गृहित धरुन प्राधिकरणाच्या लेख्यातून काढून टाकाव्या लागतील.

३.११ मुख्य सचिव व अध्यक्ष यांनी असेही सांगितले की, प्राधिकरणाने या अगोदर वेळोवेळी शासनाची निकड विचारात घेऊन शासनास निधी उपलब्ध करुन दिलेला आहे. परंतु शासनाने मुंबई नागरी परिवहन प्रकल्पाची जबाबदारी प्राधिकरणावर टाकली असल्यामुळे प्राधिकरणास त्या प्रकल्पाकरीता निधी राखून ठेवणे व वेळेवर उपलब्ध करुन देणे आवश्यक आहे. त्यामुळे शासकीय संस्थांमध्ये अडकलेला निधी वेळेवर प्राधिकरणाला परत मिळणे आवश्यक आहे. कार्यकारी समितीच्या पुढील बैठकीत प्राधिकरणाचा निधी प्रवाह तक्ता (Fund Flow Statement) सादर करावा असेही निदेश दिले.

३.१२ त्यानंतर, बाब टिप्पणीतील प्रस्ताव कार्यकारी समितीने मान्य केला व पुढील ठराव मंजूर केला :-

<u>ठराव क्र.८४४</u> :

"असा ठराव करण्यात येत आहे की, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, १९७४ च्या कलम ७ (३) (५) व याबाबतीत त्यास सहाय्यभूत होणा-या इतर सर्व अधिकारांचा वापर करुन कार्यकारी समिती याद्वारे शासनाच्या वित्त विभागाला रु.४०० कोटी ठेव रक्कम सहा महिन्याच्या कालावधीकरीता बाब टिप्पणीच्या परिच्छेद क्र.१२ मधील (अ.क्र.५ मधील अट वगळून) इतर अटी व शर्तीवर देण्यासाठी कार्योत्तर मंजूरी देण्यात येत आहे."

वेळेअभावी खालील बाब टिप्पण्यांवर विचारविमर्श करण्याचे लांबणीवर टाकण्यात आले :-

<u>बाब क्र.४</u> : <u>कर्मचारीवृंदाचा आकृतीबंद व मनुष्यबळाचे नियोजन अभ्यास.</u>

<u>बाब क्र.५ (अ)</u> : <u>मुंबई नागरी विकास प्रकल्प-फिरता निधी- दिनांक १ जुलै,२००१ ते दिनांक ३० सप्टेंबर,२००१ या कालावधीचा त्रैमासिक अहवाल.</u>

<u>बाब क्र.५ (ब)</u> : <u>दिनांक ३०-९-२००१ रोजी संपणा-या तिमाहीचे प्राधिकरणाचे त्रैमासिक लेखे.</u>

त्यानंतर, अध्यक्षांचे आभार मानून बैठकीचे कामकाज समाप्त झाले.

*********